सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ०४/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६२०

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्या सौ.वहिदा अय्याज नायकवडी यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली शहरामध्ये अखिल भारतीय साहित्य संमेलनासाठी तत्कालीन मा.राष्ट्रपती महोदया सांगली नगरीमध्ये आलेल्या होत्या. त्यावेळी महापालिका क्षेत्रातील अनेक रस्ते व चौकातील रस्त्याकडेची खोकी काढून टाकण्यात आलेली होती.सदर खोक्यांचे सहा महिन्यात पुनर्वसन करणेचे आश्वासन दिलेले होते. तथापि आजअखेर पुनर्वसन संपुर्णपणे करण्यास महापालिका यशस्वी होवू शकलेली नाही तसेच सदर खोक्याची पुनर्वसन करणेचे झाल्यास आज अखेरपर्यतचे खोक्याचे भाडे प्रशासनाच्या वतीने मागणी केली जाते ही बाब नैसर्गिक हक्कास बाधा आणणारी असून, खोकी अस्तित्वात नसताना भाडे मागणी करणेस न्यायीक वाटत नाही. त्यामुळे सदर पुनर्वसनामध्ये ज्या खोकीधारकांची खोकी काढण्यात आलेली आहेत व ज्यांचे अद्याप पुनर्वसन झालेले नाही अशा खोकीधारकांचे खोकी काढल्यापासून खोकीपुनर्वसन होईतोपर्यतचे भाडे मागणीपत्र रद्द करणे व ज्या खोकीधारकांचे अद्यापी पुनर्वसन झालेले नाही त्या खोकीधारकांचे पुनर्वसन करणेस व याबाबत यापुर्वी महासभा ठराव क्र.१२१ दि.११/१०/२०१२ रोजी झालेल्या ठरावामध्ये अंशत: बदल करुन खोकी पुनर्वसन करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- सौ. वहिदा नायकवडी ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सौ. आरती वळवडे

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ०४/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६२१

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सन २०२३-२४ करिता महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग,शासन निर्णय क्र.मनपा-२०२३/प्र.क्र.३२८(४७)/नवि-१६ मंत्रालय,मुंबई यांचे दि.२१ जुलै २०२३ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद योजनेंतर्गत खालील नमुद मंजुर ४८ कामांचा एकूण र.रु.१० कोटी मात्रचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम उपविभाग,सांगली यांचेकडून जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	कामाचे नांव	रक्कम रुपये
१	प्रभाग क्र.१ मधील रामकृष्णनगर येथील स्वामी समर्थ मंदीर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे.	२५००००/-
२	प्रभाग क्र. १ मधील अहिल्यानगर येथील डॉ.सलीम मुजावर दवाखाना ते वैभव सुर्यवंशी घरापर्यंतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरणे व विचारे मळा येथील आण्णा विचारे घर ते नदाफ घरापर्यंतचा रस्ता मुरूमीकरण करणे.	१०००००/-
३	प्रभाग क्र. १ मधील दत्ता धायगुडे ते सलीम मुजावर यु टाईप रस्ता हॉटमिक्स करणे.	२५००००/-
४	प्रभाग क्र. १ यशवंतनगर सर्जेराव गायकवाड घर ते कदमसर घरासमोरील रस्ता कॉक्रीटकरण करणे.	१०००००/-
५	प्रभाग क्र. १ रत्नत्रय कॉलनी अंतर्गत खुल्या जागेत रस्त्यालगत व ओपनस्पेस मध्ये सुशोभिकरण करणे.	१०००००/-
६	प्रभाग क्र. १ प्रकाश नगरगल्ली नंबर एक सादिक किराणा स्टोअर्स ते मानेघर परिसरातील रस्ते करणे.	१५००००/-
७	प्रभाग क्र. २ मधील चाणक्य चौक १०० फुटी रस्ता ते ओम हौसिंग सोसायटीकडे जाणारा रस्ता करणे.	३०००००/-
८	प्रभाग क्र. २ कुपवाड मधील साईकॉलनी व पोलीस कॉलनी मधील अंतर्गत रस्ते मुरूमीकरण करणे.	३०००००/-
९	प्रभाग क्र. २ सुंदर कॉलनी कुपवाड येथे पायाभूत सोईसुविधा करणे रस्ते मुरूमीकरण करणे.	२०००००/-
१०	प्रभाग क्र. ८ गंगा नगर गल्ली नं २ रस्ता करणे.	१५००००/-
११	प्रभाग क्र. ८ ड मधील वारणाली पाटबंधारे ऑफीस ते गंगानगर गल्ली नं ३ डांबरीकरण करणे.	३०००००/-
१२	वॉर्ड क्र. ८ शिवनगर कॉलनी अंतर्गत रस्ते खडीकरण करणे.	१३००००/-
१३	प्रभागक्र. ८ शारदानगर गल्ली नं २ रस्ता रूंदीकरण व डांबरीकरण करणे.	१५००००/-
१४	प्रभाग क्र. ८ विद्यानगर गल्ली नं २ प्रणव जगताप घर ते पठाण घर रस्ता मुरूमीकरण करणे.	१०००००/-
१५	प्रभाग क्र. ८ स्वामीनगर वानलेसवाडी येथील पुष्पराणी सदन ते सुमती अपार्टमेंट रस्ता करणे.	१५००००/-
१६	प्रभागक्र. ९ तामगावे घर ते देसाई घरापर्यंत आर.सी.सी. गटर करणे.	१३००००/-
१७	प्रभागक्र. ९ सरगर घर ते संगपुरे घरापर्यंत आर.सी.सी. गटर करणे.	१८००००/-
१८	प्रभागक्र. ९ आरवाडे पार्क मधील रस्ते डांबरीकरण करणे.	३५००००/-

१९	प्रभागक्र. ९ मधील रजपूतमळा येथील अंतर्गत गटर करणे.	३८०००००/-
२०	प्रभागक्र. १० मधील वरद हॉस्पीटलच्या पूर्वेस मयूर कॉलनी रिसालदारमळा माधवनगर रोड येथील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे.	३५०००००/-
२१	प्रभाग क्र. १२ मधील माधवनगर रोडवरील शिवोदयनगर अंतर्गत रस्ते करणे.	६००००००/-
२२	प्रभाग क्र.१२ कर्नाळ रोड येथील भोसले गार्डन लगतच्या गल्ली नं १ व २ येथील रस्ता मुरूमीकरण व डांबरीकरण करणे.	३००००००/-
२३	प्रभाग क्र. १३ सांगलीवाडी मधील अंतर्गत रस्ते करणे.	३००००००/-
२४	प्रभाग क्र. १६ हिराबाग कॉर्नर चौक ते गरवारे कॉलेज पर्यंत रस्ता करणे.	२५०००००/-
२५	प्रभाग क्र. १६ मधील कडलास्कर गल्ली मधील रस्ते करणे.	१५०००००/-
२६	प्रभाग क्र. १७ त्रिमुर्ती हौसिंग सोसायटी L टाईप रस्ता करणे.	१००००००/-
२७	प्रभाग क्र. १७ नयनतारा हॉस्पिटल चौक ते श्रीवल्लभ अपार्टमेंट रस्ता करणे.	१५०००००/-
२८	प्रभाग क्र.१७ मधील ओमफुड परिसरातील स्वस्तिक चौक येथील T टाईप रस्ता करणे.	१००००००/-
२९	प्रभाग क्र.१७ मधील किसान चौक येथील रस्ता करणे.	१००००००/-
३०	प्रभाग क्र. १७ विकास चौक रोहिणी अपार्टमेंटच्या पिछाडीस सुर्यवशी घर ते डॉ.शित्रेघर रस्ता करणे.	४०००००/-
३१	प्रभाग क्र. १७ शिवप्लाझा शिवप्राईड शिवअवेन्यू अंतर्गत रस्ते कॉक्रीट करणे.	२००००००/-
३२	प्रभाग क्र. १८ शामरावनगर येथील सिंधु सांस्कृतिक भवन ते वुडलेंड हॉटेल पर्यंत पुर्वपश्चिम रस्ता करणे.	३८०००००/-
३३	प्रभाग क्र. १८ अब्दुल कलामनगर कॉलेज शामरावनगर मधील असिफ पटेल ते इसन्ना कोळीवाड घर रस्ता करणे.	२४०००००/-
३४	प्रभाग क्र १८ मधील गल्ली नं ११ बावधनकर सप्लायर्सच्या समोर आकाशवाणी केंद्राच्या मागील रस्ता करणे.	२००००००/-
३५	प्रभाग क्र. १८ शामरावनगर मेनरोड मुल्याघर ते प्रणव ग्लासआर.सी.सी गटर करणे.	५००००००/-
३६	प्रभाग क्र. १८ मधील महावीर पार्क गल्ली नं.२ पी.सी.सी. गटर करणे.	१५०००००/-
३७	प्रभाग क्र. १८ कोल्हापूर रोड महमद आली बागवान यांच्या प्लॉट समोरील रस्ता करणे.	१००००००/-
३८	प्रभाग क्र. १८ मधील विठ्ठलनगर येथील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे.	२००००००/-
३९	प्रभाग क्र. १९ मधील प्रजिमाक्रं. ८५ ते प्रजिमाक्र. १२८ पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	४५०००००/-
४०	प्रभाग क्र. १९ मधील लिमये प्लॉट ते रेशीमगाठी मंगल कार्यालय पर्यंतआर.सी.सी.गटर करणे.	३००००००/-
४१	प्रभाग क्र. १९ गजराज कॉलनी अंतर्गत रस्ते करणे.	१००००००/-
४२	प्रभाग क्र.१९ कुंभार मळा पश्चिम बाजुस खडीकरण मुरूमीकरण करणे.	१२०००००/-
४३	प्रभाग क्र. १९ मधील वृंदावनविला जवळ शिवशक्ती हॉस्पीटल ते किडस पॅरेडायस पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	१८०००००/-
४४	प्रभाग क्र. १९ मधील वृंदावनविला जवळ मोरया घर ते कलश घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	१००००००/-
४५	प्रभाग क्र. १९ मधील वृंदावनविला जवळ कलश घर ते यमुना लिलाघर ते प्रजिमाक्र. ८५ पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	१५०००००/-
४६	प्रभाग क्र. १९ मधील वृंदावनविला जवळ किडस पॅरेडाईज ते साईधाम बंगल्यापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	१००००००/-
४७	प्रभाग क्र. १९ मधील वृंदावनविला जवळ गोताड घर ते प्रजिमाक्र. ८५ पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	१६०००००/-
४८	प्रभाग क्र. १९ मधील वृंदावनविला जवळ सागर बीजरगी घर ते पाटील घर ते आकांक्षा घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	१६०००००/-
	एकूण	१०,००,००,०००/-

सूचक :- श्री. संजीव पाटील ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. मैनुद्दीन बागवान D. P. Surjavanshi

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ०४/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६२२

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्य श्री.संतोष शिवदास पाटील यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिकेची शासकीय निधीतून मंजूर झालेली गर्व्हमेंट कॉलनी उंच पाण्याची टाकी बांधणे व वितरण व्यवस्था करणे तसेच शामनगर येथे उंच पाण्याची टाकी बांधणे व वितरण व्यवस्था करणे सदरची दोन्ही कामे ए.ई.इन्फ्रास्क्चर,ठाणे या ठेकेदार मंजूर होती. सदर कामासाठी डिसेंबर २०२१ मध्ये वर्क ऑर्डर दिलेली होती. सदर कामाची मुदत डिसेंबर २०२२ पर्यत होती. तथापि, सदर ठेकेदार यांनी सदरची कामे कालावधी संपूण गेला तरीही अद्यापपर्यत पुर्ण केलेली नाहीत. सदर ठेकेदारास प्रशासनाकडून वारंवार तोंडी सूचना दिल्या आहेत. तसेच लेखी नोटीसही बजावण्यात आलेली आहे. तरीही सदर ठेकेदारांने काम बंद ठेवलेले असून, अद्यापही कामास सुरुवात केलेली नाही.

तसेच, सदर ठेकेदारास यापुर्वी युआयडी योजनेमधून सांगली वसंत कॉलनी येथे पाण्याची टाकी व वितरण व्यवस्थाची कामगिरी मंजूर असून, सदरची कामगिरी ही सदर ठेकेदार यांनी अद्याप पुर्ण केलेली नाही याबाबत ठेकेदार यांना लेखी नोटीसाही देणेत आलेल्या आहेत. उपरोक्त सर्व कामे शासन निधीतून असतानाही सदर ठेकेदार जाणीवपुर्वक कामे करत नाही अशा सन्मा.सदस्यांच्या वारंवार तक्रारी येत आहेत. उक्त बाबींचा विचार करता ठेकेदार ए.ई.इन्फ्रास्क्चर,ठाणे यांना काळ्या यादीत टाकणेची कार्यवाही प्रशासनाने करावी व सदर ठेकेदाराचे डिपॉझीट जप्त करुन, सदरची कामे अन्य ठेकेदारामार्फत पुर्ण करुन घ्यावीत असे ही सभा आदेशित करीत आहे. तसेच, सदर ठेकेदार यांना काळ्या यादीत टाकणेबाबत ही सभा मा.आयुक्तसो यांना प्राधिकृत करीत आहे.

सूचक :- श्री. संतोष पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. प्रकाश मुळके

D.P. Surjavanshi
महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५

दिनांक :- ०४/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६२३

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्या सौ.संगिता अभिजीत हारगे यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.महासभा ठराव क्र.५१० दि.१९/०५/२०२३ अन्वये पारित करण्यात आलेल्या ठरावामधील अ.नं.१२५ मिरज वॉर्ड क्र.२० (क) मधील नरवाडे गल्ली हंगड गल्ली ते कनवाडकर हौद रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे र.रु.१० लक्ष व अ.क्र.१२६ मिरज वॉर्ड क्र.२०(क) मधील काळी मस्जिद ते गणेश मंदिर ते कनवाडकर हौद रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे र.रु.१० लक्ष अशा दोन कामगिऱ्यांचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी सादर करणेस मान्यता देणेत आलेली होती. सदर प्रस्तावातील दोन्ही कामगिऱ्यांना काही तांत्रिक अडचणीमुळे मान्यता मिळालेली नसून सदर दोन्ही कामांचा निधी हा त्याच प्रभागातील मिरज वॉर्ड क्र.२० (क) मधील कृष्णाघाट वांगी रोड मुरुमीकरण खडीकरण करणे अंदाजीत र.रु.२५ लक्ष मात्रचा प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेंतर्गत अंतर्गत जिल्हा नियोजन समितीकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- सौ. संगिता हारगे

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

महापौर,

अनुमोदक :- सौ.प.वि.केरीपाळे, सौ. पवित्रा केरीपाळे

शहर अभियंता

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ०४/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६२४

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्य श्री.योगेंद्र भगवान थोरात यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सन २०२३-२४ लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेंतर्गत महापालिका क्षेत्रामधील विविध विकास कामांचा ठराव करुन महासभा क्र.०२ ठराव क्र.५०९ मधील काम क्र.१०४ मिरज वॉर्ड क्र.२० अ पाटील चौक ते कनवाडकर हौद चौक रस्ता हॉटमिक्स करणेर.रु.२९,९९,९९९/- मात्रचे प्रस्तावित केले होते. त्या ठिकाणी तांत्रिक अडचण असल्याने त्याऐवजी रत्नागिरी नागपूर हायवे उत्तर दक्षिणेकडील रस्ते बी.बी.एम.बी.एम. हॉटमिक्स करणे र.रु.२९,९९,९९९/- मात्रचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. योगेंद्र थोरात

अनुमोदक :- श्री. मिरज दुर्वेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ०४/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६२५

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्य श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिकेच्या वतीने उद्यान विभाग,अग्निशमन विभाग व कार्यशाळा विभागाकडे बाह्यस्त्रोताद्वारे कर्मचारी पुरविण्याचा ठेका आदम्स एन्टप्रायझेस यांना देणेत आलेला आहे. सदर ठेकेदारामार्फत पुर्रविण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेतन महापालिकेच्या वतीने संबंधीत कर्मचारी यांच्या बँक खातेवर जमा केले जाते. तसेच, सदरचे कर्मचारी नियुक्त करताना प्रशासनाकडून मान्यता घेतली जाते व जे कर्मचारी कामावर येत नाहीत किंवा ज्यांचेकडून गैरवर्तन होते त्यांचे जागी नविन कर्मचारी नियुकत करताना त्याचीही मान्यता प्रशासनाकडून घेतली जाते. तथापि आज सभागृहामध्ये सदर ठेकेदारामार्फत पुरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांना दिलेले वेतनामधून ठराविक रक्कम ठेकेदार काढून घेत असलेच्या तक्रारी केलेल्या असून, जे कर्मचारी रक्कम देत नाहीत त्यांना कामावरुन कमी केले जाते अशी ही तक्रार कर्मचाऱ्यांना सभागृहामध्ये येवून केलेली आहे.

सदर बाबत सभागृहामध्ये सदस्यांनी तीव्र भावना व्यक्त केल्या असून, सदर ठेकेदारावर कारवाई करणेची मागणी केलेली असून, कोणत्याही कर्मचाऱ्यास सबळ कारणाशिवाय कामावरुन कमी करु नये अशा सूचना ठेकेदारास देणेची मागणी केलेली आहे. त्यानुसार सदर कर्मचाऱ्यांनी केलेल्या तक्रारीची चौकशी करुन, ठेकेदारावर नियमानुसार कारवाई करणेसाठी ही सभा मा.आयुक्तसो यांना प्राधिकृत करीत आहे.

सूचक :- श्री. संजय मेढे ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री विष्णू माने

D.P.Suryavanshi
महापौर,

महानगरपालिका साधव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ **दिनांक :-** ०४/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६२६

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्य श्री.विनायक रमेश सिंहासने यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका हद्दीमधील सांगली सि.स.नं.१७०/अ/१ माधवनगर रोड येथील महापालिकेच्या खुल्या जागेत उभारणेत येत असलेल्या शॉपिंग कॉम्प्लेक्स मध्ये १४ दुकान गाळे ई-लिलावानुसार भाडे तत्वावर देणेस मा.महासभा ठराव क्र.४८३ दि.२०/०४/२०२३ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे.

सदर सर्व्हे नंबर मध्ये अजूनही जागा रिकामी असून, त्याठिकाणी १४.०९ स्क्वे.मी. (१५१ स्क्वे.फुट मापाचे) आणखी १२ दुकान गाळे तयार होवू शकतात व त्यामधून महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होणार असलेने सदर शिल्लक जागेमध्ये आणखी १२ किंवा त्यापेक्षा जास्त दुकान गाळे बांधण्यास ही सभा मान्यता देत असून, सदर गाळ्यासाठी जागेला सहा.संचालक नगररचना यांचेकडून चालू बाजारभावाने भूई भाडे ठरवून घेवून, स्वखर्चाने गाळ्याचे बांधकाम करुन घेणेच्या अटीवर २९ वर्षे मुदतीने श्री.दशरथ दादासो दुधाळ यांना सदरची जागा भूईभाडेने देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. विनायक सिंहासने ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. उमेश पाटील D. P. Suryavanshi महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- ०४/०८/२०२३

ठराव क्रमांक :- ६२७

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.२५/०७/२०२३ चे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये श्री.प्रविण पाटील यांचे तर्फे वटमुख्यत्यारधारक श्री.सुशांत जयकुमार चौगुले यांनी त्यांच्या मालकीच्या सांगली मधील स.नं.९५/४ (जुना ३८७/४) मधील ३९०० चौ.मी. क्षेत्रफळाच्या व श्रीमती सुधाताई जंबू इराज स.नं.९५/४ (जुना ३८७/४) मधील ४१०० चौ.मी.क्षेत्रफळाच्या मिळकतीवरील आरक्षण क्र.१७८ सिटी पार्क या आरक्षणाने बाधीत होणाऱ्या क्षेत्राची खरेदी सूचना बजावलेली होती व सदरची खरेदी सूचना शासनाच्या नगरविकास विभागाने मा.संचालक नगररचना तथा सहसचिव यांना कलम ४९ च्या अन्वये असलेल्या अधिकारांचा वापर करुन, खरेदी सूचना कायम करीत असलेबाबत कळविलेले आहे. तथापि, सद्यस्थितीत महापालिकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असलेने महापालिकेस सदर जागेचे भूसंपादन करता येणे शक्य नसलेने वटमुखत्यारधारक सूचनाकर्ते यांना आरक्षित जागेसाठी TDR अथवा FSI अथवा AR देवून सदर जागेचे भूसंपादन करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. विष्णू माने ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. संतोष पाटील. D. Suryavanshi महापौर,

स.स.न.र.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका